## वाचकांचा शेरा!

'लोकसत्ता' मधील 'शासनाला इशारा- मराठी शाळांचा' हा लेख वाचला. 'लोकसत्ता'त कितीतरी मान्यवरांचे लेख आलेले आहेत; पण कोठेही रात्रशाळांचा उल्लेख नाही. महाराष्ट्रात रात्रशाळा, रात्र कनिष्ठ महाविद्यालये, रात्रमहाविद्यालये यांची संख्या एकूण कमीच आहे. त्यामुळे त्यांची व्होट बँक कमी. शासनापर्यंत आवाज पोहोचविण्याचे साधन नाही. बहुसंख्य रात्रशाळा या मराठी माध्यमाच्या आहेत. रात्रशिक्षण व्यवस्थेत आज ४०,००० च्यावर विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु वेतनेतर अनुदान २००४ पासून बंद झाल्याने शिक्षकांकडून वर्गणी काढून भाडे, इलेक्ट्रिसिटी बील, कार्यालयीन सामग्रीचा खर्च इ. भागविले जातात.

# रात्रशाळांचे काय?

शुभदाताईंनी असे म्हटले आहे, की वेतन व वेतनेतर अनुदानासाठी दुसरा मार्ग शोधता येईल. आमच्या रात्रशाळांचे विद्यार्थी गरीब, पालक गरीब आहेत. मग खर्चासाठी पैसा कसा मिळवायचा? दिनप्रशालांचे (प्रथितयश) पालक सधन असतात. ते न कुरकुरता मदत देऊ शकतात. तसे रात्रशाळांचे होत नाही.

म्हणून महात्मा फुल्यांनी जे रात्रशाळेचे रोपटे लावले ते टिकवायचे असेल तर कोणतीही रात्रशाळा विनाअनुदानित असता कामा नये. वेतनेतर अनुदानही दिले पाहिजे. आम्ही तीन तास शाळा भरवितो व अभ्यासक्रम पूर्ण करण्याचा प्रयत्न करतो. रात्रशाळांतील मुले खासगी शिकवणी वर्गास जाऊ शकत नाही. दोन वेळ जेवणाची परवड, मग ही क्लासची फी कशी देता येईल? त्यांना रात्रशाळांतील अध्ययनावर अवलंबून राहावे लागते. नवीन गुणदान पद्धतीमुळे रात्रशाळांचे शालान्त परीक्षेचे निकाल चांगले लागत आहे. रात्र कनिष्ठ महाविद्यालयांचे निकालही उत्तम लागत आहे. म्हणून त्यांना सर्व प्रकारचे अनुदान मिळणे आवश्यक आहे. इतकेच नव्हे तर या काबाडकष्ट करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन किंवा निर्वाहभत्ता देण्याची गरज आहे.

आश्रम शाळांना जे मंजुरीसाठी पटसंख्येचे नियम लावलेले आहेत त्याच्या निम्मी पटसंख्या धरावी. मुलींच्या रात्रशाळांना तर विशेष प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे, की जेथे मान्यताप्राप्त रात्रशाळा आहेत, अनुदान संहितेत त्यांचा विशेष उल्लेख आहे. आमचा आवाज शासनापर्यंत जावा म्हणून हा पत्रप्रपंच!

■ **व्ही. व्ही. चिकोडीकर,**
माजी अध्यक्ष, रात्रप्रशाला मुख्याध्यापक संघ.